ePaper

|वर्ष - 6 ।अंक - 206| UDYAM-MH-26-0158827|

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com |बुधवार ।दिनांक 9 नोव्हेंबर 2022| पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# भारत जोडो यात्रेचे ट्विटर अकाउंट होणार नाहीत ब्लॉक



## आतील पानांत


- कुरकुंभ औद्योगिक वसाहतीत रिएक्टरचा स्फोट
- पिंपरी-चिंचवडला 'स्पोर्ट्स हब' बनवण्याचा संकल्प!
- ५० खोके घेतल्याचा आरोप अजित पवार, सुप्रिया सुळे, आदित्य ठाकरेंना भोवणार?


# ऊरो रुग्णालयाची इमारत अनधिकृत?

## आमदार लक्ष्मण जगताप यांची मागणी : हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करा

।पिंपरी-चिंचवड ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पुणे जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागामार्फत औंध ऊरो जिल्हा रुग्णालयाच्या आवारात जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राची इमारत उभारण्याचे काम सुरू आहे. त्यासाठी आवश्यक परवानग्या आणि नियोजित इमारतीचा प्लॅन मंजूर नसतानाही घाईघाईने निविदा काढून काम सुरु केल्याने जिल्हा परिषदेच्या कामकाजाच्या क्षमतेबाबत शंका निर्माण झाली आहे. याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांच्या निष्काळजी आणि हलगर्जीपणाची चौकशी करावी. चौकशीनंतर दोषींवर शासकीय नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी आमदार लक्ष्मण जगताप यांनी जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांच्याकडे केली आहे.**






यासंदर्भात आमदार जगताप यांनी जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, "पुणे जिल्ह्यातील दिव्यांगाना येणाऱ्या समस्या, अडचणींचा सामना करण्यासाठी तसेच त्यांना सक्षम करणे गरजेचे असल्याने दिव्यांगांच्या कल्याणाच्या दृष्टीने जिल्हा परिषदेच्या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी समाज कल्याण विभागाने साडेतीन कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला आहे. हा निधी जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे. या निधीतून जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागामार्फत पिंपरी-चिंचवड शहराच्या हद्दीतील औंध ऊरो जिल्हा रुग्णालयाच्या आवारात चारशे चौरस मीटर जागेवर जिल्हा दिव्यांग पुर्नवसन केंद्राच्या इमारतीचे काम सुरु करण्यात आले आहे.



> तत्कालीन पालकमंत्र्यांची दिशाभूल करून या केंद्राच्या नियोजित इमारतीचे भूमीपूजनही करण्यात घाईगडबड करण्यात आली होती. या सर्व प्रकरणी जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या कार्यपद्धतीची तसेच अधिकाऱ्यांच्या निष्काळजी आणि हलगर्जीपणाची चौकशी करावी. चौकशीनंतर दोषींवर शासकीय नियमानुसार कारवाई करावी.
>
> - **लक्ष्मण जगताप,** आमदार, भाजपा

जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र इमारतीचा प्लॅन पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून मंजूर नसतानाही काम सुरू आहे. धक्कादायक म्हणजे त्यासाठी वीज व पाण्याचे बेकायदेशीर कनेक्शन घेण्यात आले आहे. इमारतीचे बांधकाम मनमानी पद्धतीने विनापरवाना सुरु आहे. तसेच ज्या क्षेत्रावर बांधकाम करावयाचे आहे ती जमीन जिल्हा परिषदेच्या नावावर झालेली नाही. या कामांमध्ये संबंधित अधिकारी व ठेकेदाराचे आर्थिक संगनमत दिसून येत आहे. इमारतीचा प्लॅन मंजूर नसतानाही घाईघाईने निविदा काढून काम सुरु केल्याने जिल्हा परिषदेच्या कामकाजाच्या क्षमतेबाबत शंका निर्माण झाली आहे.

# 'धन्यवाद मोदीजी'... २ हजार आभार पत्रे!

## युवा मोर्चा शहराध्यक्ष संकेत चोंधे यांचा पुढाकार

### सर्वसामान्य नागरिकांचा उपक्रमात सहभाग

।पिंपरी ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

कोरोना काळात सर्वसामान्य नागरिकांसाठी केंद्र सरकारने जाहीर केलेल्या योजनांच्या काटेकोर अंमलजावणीबद्दल आभार मानणारी तसेच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या देश सेवेप्रती महाराष्ट्रातील नागरिकानी त्यांचे धन्यवाद मानण्याचा अनोखा उपक्रम भारतीय जनता युवा मोर्चाच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रातून राबविला जात आहे. याचाच एक भाग म्हणून पिंपरी-चिंचवड शहर भाजप युवा मोर्चाच्या वतीने शहरातून आतापर्यंत २ हजार आभार पत्रे पाठवण्यात आली. भाजपा युवा मोर्चो शहराध्यक्ष संकेत चोंधे यांच्या पुढाकाराने हा उपक्रम घेण्यात आला. यावेळी प्रदेश महामंत्री (सरचिटणीस) सुशिल मेंगडे, राष्ट्रीय चिटणीस गौरव गौतम यांच्याकडे पिंपरी-चिंचवड शहरातील कस्पटे वस्ती, वाकड भागातील नागरिकांनी २००० पत्र देऊन त्यांचे विचार आणि त्यांचे आभार नरेंद्र मोदी यांच्यापर्यंत पोचवण्याकरता पत्राच्या लेखी स्वरूपात सुपूर्त केले.



> बहुतांश पत्रांमध्ये पंतप्रधान मोदी यांच्या आजवरच्या कामाचे कौतुक करण्यात आले असून, कोरोनाकाळात आपल्या नेतृत्वात म्हणजेच पंतप्रधान नरेंद्रजी मोदींच्या नेतृत्वात देशातील नागरीकांसबतच ईतर देशातील नागरीकांना लसी उपलब्ध करून "वसुधैव कुटुंबकम" म्हणजेच सर्व जग आपल कुटुंब आहे हे दाखवुन दिले. पत्र लिहिणाऱ्यांमध्ये भाजपच्या समर्थकांशिवाय काही सर्वसामान्य नागरिकांचाही समावेश आहे. ही पत्रे संकलीत करण्यासाठी पिंपरी-चिंचवड शहर भाजप युवा मोर्चाचे पदाधिकारी एकत्र आले होते. या कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या उत्स्फूर्त प्रतिक्रिया पंतप्रधान मोदी यांच्यापर्यंत पोहोचवल्या आहेत.
>
> - **संकेत चोंधे,** शहराध्यक्ष, भाजपा युवा मोर्चा, पिंपरी-चिंचवड.

यावेळी प्रदेश सदस्य अजित कुलथे, पिंपरी चिंचवड युवा मोर्चा प्रभारी गणेशदादा वरपे, क्रीडा संयोजक जयदेव डेब्रा, पिंपरी-चिंचवड युवा मोर्चा अध्यक्ष संकेत चोंधे, सरचिटणीस दिपक नागरगोजे, तेजस्विनी कदम, उपाध्यक्ष प्रसाद कस्पटे, संदिप नखाते, मोहित बुलानी, सनी बारणे, विक्रांत गंगावणे, दिगंबर गुजर, सुहास आढाव, अनिकेत शेलार, तेजस मुळे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# कुरकुंभ औद्योगिक वसाहतीत रिएक्टरचा स्फोट!

## तीन कामगार जखमी: औद्योगिक वसाहतीतील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**।कुरकुंभ। महाईन्यूज।**

दौंड तालुक्यातील कुरकुंभ औद्योगिक वसाहतीतील शोगन ऑरगॅनिक्स लिमिटेड कंपनीत रासायनिक प्रक्रिया चालू असताना अचानक रिएक्टरचा स्फोट होऊन लागलेल्या आगीत तीन कामगार जखमी झाले असून सुदैवाने जिवितहानी झाली नसल्याची प्राथमिक माहिती आहे. स्फोटाने परिसरात जोरात हादरा बसला. या घटनेने पुन्हा कुरकुंभ औद्योगिक वसाहतीतील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



कुरकुंभ औद्योगिक वसाहतीतील शोगन ऑरगॅनिक्स कंपनीत दुपारच्या सुमारास रिऍक्टरमध्ये केमिकलची रासायनिक प्रक्रिया चालू असताना अचानक स्फोट झाल्याने आग लागली. आग व धुराचे लोट लांब अंतरावरून दिसत होते. त्यामुळे कुरकुंभ, पांढरेवाडी परिसरातील ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते. आगीत रिऍक्टरच्या स्फोटामुळे लागलेल्या आगीत तीन कामगार जखमी झाल्याची प्राथमिक माहिती मिळते आहे. मात्र जखमी कामगारांची नावे व पत्ता समजू शकला नाही. आग व धुराचे मोठया लोटांमुळे दुर्घटन मोठी दिसत असूनही सुदैवाने जिवितहानी झाली नाही. मात्र स्फोटाने कुरकुंभ, पांढरेवाडी परिसराला जोरात हादरा जाणवला. औद्योगिक वसाहतीत मोठयाप्रमाणात केमिकल कंपन्या असल्याने आग व स्फोट होण्याच्या घटना वारंवार घडतात. त्यामध्ये अनेक कामगारांना जीव गमवावा लागला आहे. तर काहींना कायमचे अपंगत्व आले आहे. मात्र अशा घटना घडल्यानंतरच वसाहतीतील सुरक्षेबाबत चर्चा होते. पुन्हा मात्र प्रशासन व स्थानिकांकडून दुर्लक्ष केले जाते. हा जीवघेणा त्रास आणखी किती वर्ष सहन करायचा असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. या घटनेने सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# पथारी व्यवसायिकांचे 'रोजगार वाचवा' आंदोलन

## (ता. ९) महापालिकेपुढे सकाळी ११ वाजत 'रोजगार वाचवा' आंदोलन

**।पुणे। महाईन्यूज ।**

पुणे महापालिकेतर्फे फेरीवाला समितीच्या आठ पदांसाठी निवडणूक घेतली जाणार आहे. पण १० हजार पथारी व्यावसायिकांचा मतदानाचा हक्क काढून घेतल्याच्या विरोधात तसेच प्रमाणपत्र नोंदणी रद्द करू नये या मागणीसाठी ज्येष्ठ कामगार नेते डॉ. बाबा आढाव यांच्या नेतृत्वात उद्या (ता. ९) महापालिकेपुढे सकाळी ११ वाजत 'रोजगार वाचवा' आंदोलन केले जाणार आहे.एकीकडे केंद्र आणि राज्य सरकार लाखो रोजगार निर्माण करण्याचा दावा करत आहे. मात्र त्याच वेळी सध्या राज्य सरकारचे प्रतिनिधी असलेल्या महापालिका आयुक्तांच्या प्रशासनाखाली असलेल्या पुणे मनपाने ऑगस्ट २०२२ ला फेरीवाला समितीसाठी जाहीर केलेली पथारी व्यवसायांची अंतिम मतदार यादीमधून दहा हजारावर मतदारांची नावे तर वगळली आहेत. पण त्याचबरोबर या पथविक्रेत्यांचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द करणार आहोत, असेही नुकतेच जाहीर केले आहे. हा निर्णय मागे घ्यावा या प्रमुख मागणीसाठी महापालिका भवनासमोर 'रोजगार वाचवा' आंदोलन केले जाणार आहे.



> एकीकडे केंद्र आणि राज्य सरकार लाखो रोजगार निर्माण करण्याचा दावा करत आहे. मात्र त्याच वेळी सध्या राज्य सरकारचे प्रतिनिधी असलेल्या महापालिका आयुक्तांच्या प्रशासनाखाली असलेल्या पुणे मनपाने ऑगस्ट २०२२ ला फेरीवाला समितीसाठी जाहीर केलेली पथारी व्यवसायांची अंतिम मतदार यादीमधून दहा हजारावर मतदारांची नावे तर वगळली आहेत. पण त्याचबरोबर या पथविक्रेत्यांचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द करणार आहोत, असेही नुकतेच जाहीर केले आहे.

# लम्पी बळींची संख्या चौदा हजारांवर; भरपाईची प्रक्रिया संथ!

## चार हजार पशुपालकांना दहा कोटींचे वितरण

**पुणे ।महाईन्यूज।**

**लम्पी रोगामुळे राज्यात आजअखेर १३,७७६ जनावरांचा मृत्यू झाला आहे. लम्पीमुळे जनावरांचा मृत्यू होऊन अडचणीत आलेल्या पशुपालकांना आर्थिक मदतीची घोषणा राज्य सरकारकडून करण्यात आली असली, तरीही ही मदत देण्याची प्रक्रिया अत्यंत संथ गतीने सुरू आहे. आजवर केवळ चार हजार पशुपालकांना १०. २३ कोटींची मदत देण्यात आली आहे.**



पशुसंवर्धन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात एकूण ३३ जिल्ह्यांत लम्पीचा प्रादुर्भाव झाला आहे. एकूण २,१०,०८७ जनावरांना लम्पीची बाधा झाली आहे. त्यापैकी १,४२,०१६ पशुधन उपचारानंतर बरे झाले आहे, तर सोमवारअखेर (सात नोव्हेंबरर) १३,७७६ जनावरांचा लम्पीमुळे मृत्यू झाला आहे. आजपर्यंत लम्पी चर्मरोगामुळे मृत्युमुखी पडलेल्या गोवंशीय पशुधनाच्या ३९६३ पशुपालकांच्या खात्यांवर नुकसान भरपाई पोटी १०.२३ कोटी रुपयांची रक्कम जमा करण्यात आली आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये आजअखेर एकूण १४४.१२ लाख लस मात्रा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामधून एकूण १३६.९४ लाख पशुधनास मोफत लसीकरण करण्यात आले आहे. जळगाव, अहमदनगर, धुळे, अकोला, औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, वाशिम, जालना, हिंगोली, नंदुरबार आणि मुंबई उपनगर या जिल्ह्यांमधील लसीकरण पूर्ण झाले आहे. खासगी संस्था, सहकारी दूध संघ आणि वैयक्तिक पशुपालकांनी करून घेतलेल्या लसीकरणाच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात सुमारे ९७.८७ टक्के गोवंशीय पशुधनाचे लसीकरण पूर्ण झाले आहे.

### नमुने 'एनआयव्ही'कडे

लम्पी चर्म रोगाच्या विषाणूच्या जनुकीय परीक्षणांतर्गत जिनोम क्रमवारिता तपासणीसाठी आवश्यक नमुने राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था, पुणे (एनआयव्ही) येथे पाठविण्यात आले आहेत. या तपासणीमुळे विषाणूमधील जनुकीय स्तरावरील बदलांबाबतची माहिती अपेक्षित आहे. तसेच लसीमुळे निर्माण होणाऱ्या प्रतिकारक शक्तीचे मूल्यमापन करण्यासाठी आवश्यक नमुने बेंगलुरु येथील राष्ट्रीय रोग परिस्थिती विज्ञान व रोग माहिती संस्थेकडे पाठविण्यात येत आहेत.

> लम्पी चर्म रोगाची साथ आता पूर्णपणे आटोक्यात आली आहे. नव्याने संसर्ग होण्याचे प्रमाण खूपच कमी झाले आहे. गायींच्या कुठल्याही वयाच्या वासरांना, तसेच अद्यापही लसीकरण न झालेल्या गोवंशीय पशुधनास तातडीने लसीकरण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
>
> – **सचिन्द्र प्रताप सिंह,** आयुक्त, पशुसंवर्धन विभाग

# पिंपरी-चिंचवडला 'स्पोर्ट्स हब' बनवण्याचा संकल्प!

## माजी नगरसेवक शंकर जगताप : वाकड प्रीमियर लीगच्या चषकाचे अनावरण






**पिंपरी-चिंचवड ।। महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**नवीन पिढीला खेळण्यासाठी मैदाने उपलब्ध झाली तर निश्चितच पिंपरी-चिंचवडमध्ये क्राडी संस्कृती निर्माण होईल. आपल्या शहरातून आणखी चांगले, दर्जेदार खेळाडू घडतील व पिंपरी-चिंचवड शहराला देशाचा "क्रीडा हब" म्हणून ओळखले जाईल, असा विश्वास भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख व माजी नगरसेवक शंकर जगताप यांनी व्यक्त केला. शहरात सर्व प्रकारच्या क्रीडा प्रकारांना मैदाने आणि दर्जेदार सोयीसुविधा उपलब्ध व्हावेत यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले.**

वाकडमध्ये विनायक गायकवाड युथ फाऊंडेशनच्या वतीने आयोजित वाकड प्रीमियर लीगच्या सहाव्या पर्वाचा चषक अनावरण सोहळा रविवारी (दि. ६) दिमाखात पार पडला. पिंपरी-चिंचवड आणि पुण्यातील गृहनिर्माण सोसायट्यांच्या सभासदांसाठी आयोजित करण्यात येणारी वाकड प्रीमियर लीग ही सर्वात मोठी स्पर्धा आहे.

यामध्ये २४० हून अधिक गृहनिर्माण सोसायट्यांच्या संघांनी सहभाग घेतला आहे. त्यामुळे भव्य अशी ही स्पर्धा आहे. या स्पर्धेचे वाकडकरांना विशेष आकर्षण असते. वाकडमधील सर्वच सोसायट्यांचे सभासद या स्पर्धेत सहभागी होऊन उत्साहात सामने खेळतात. या स्पर्धेचे चषक अनावरण भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख व माजी नगरसेवक शंकर जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाला माजी महापौर उषा ऊर्फ माई ढोरे, स्थायी समितीच्या माजी सभापती ममता गायकवाड, माजी नगरसेवक विनायक गायकवाड आदी उपस्थित होते.

> "वाकड येथील पेठ क्रमांक ३९, कावेरीनगर भाजी मंडई शेजारील खेळाचे मैदान आधी पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे होते. आता ते पीएमआरडीच्या ताब्यात आहे. हे मैदान पिंपरी-चिंचवड महापालिकेकडे हस्तांतर होऊन ते वाकडकरांना उपलब्ध व्हावे, यासाठी आम्ही सर्वजण प्रयत्नशील आहोत. लवकरच हे मैदान वाकडकरांना उपलब्ध करून देऊ. शहरात आवश्यक त्या प्रमाणात क्रीडांगणे व मैदाने तयार झाली तर खरोखरच शहरातील क्रीडा क्षेत्राला एक वेगळी दिशा मिळेल. शहरात क्रीडा संस्कृती निर्माण होईल. त्यातून दर्जेदार आणि चांगले खेळाडू घडतील. आपल्या शहराला "क्रीडा हब" म्हणून ओळख मिळेल. त्यासाठी सामूहिक प्रयत्न गरजेचे आहेत. सर्व क्रीडा प्रकारांना मैदाने आणि खेळाडूंना दर्जेदार सोयीसुविधा उपलब्ध व्हावेत यासाठी प्रयत्नशील आहे.
>
> **- शंकर जगताप,**
> माजी नगरसेवक

---

## स्थानिक नागरिकांकडून 'परिवर्तन'च्या कार्याचे कौतुक

# परिवर्तन' हेल्पलाईनचा धडाका : मोशीतील रस्त्याची दुरूस्ती २४ तासांत पूर्ण

## बीआरटी रोडलगत खोदकाम बुजवून डांबरीकरण

**पिंपरी। ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**मोशीमधील बीआरटी रोडलगत गॅस पाईपलाईन टाकण्यासाठी खोदून पाईपलाईन टाकल्यानंतर डांबरीकरण न केल्याने वाहनचालक व नागरिकांनी तक्रार केली होती. याची दखल घेत 'परिवर्तन हेल्पलाईन'च्या माध्यमातून अवघ्या २४ तासांत रस्त्याची दुरूस्ती करण्यात आली. याबाबत परिसरातील नागरिकांनी 'परिवर्तन'च्या टीमचे कौतूक केले आहे.**



भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने भोसरी विधानसभा मतदार संघासह परिसरातील नागरिकांच्या प्रशासकीय आणि सर्वजनिक समस्या सोडवण्यासाठी 'परिवर्तन हेल्पलाईन' सुविधा सुरू केली आहे. त्या माध्यमातून पायाभूत सोयी-सुविधांसाठी नागरिक आणि प्रशासनमधील 'दुवा' बनत प्रश्न मार्गी लावले जातात.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने देहू-आळंदी बी आर टी रोड हा देहू व आळंदी या दोन तीर्थक्षेत्राना जोडण्यासाठी रस्ता विकसित केला आहे.

याचा काही भाग मोशी गावाच्या हद्दीतून जातो. मोशीमधील बीआरटी रोडवरील भारत माता चौक ते आळंदीपर्यंत असलेल्या ५ किलोमीटर लांबीच्या रस्त्याकडेने गॅस लाईन टाकण्या साठी रस्ता खोदला होता. पाईपलाईन टाकण्याचे काम दोन महिन्यापूर्वी पूर्ण झाले असले, तरी त्यावर डांबरीकरण अद्याप पर्यंत करण्यात आले नाही. त्यामुळे नागरिकांना व वाहनचालकांना त्रास होत असून अपघात पण होत आहेत, अशी तक्रार नागरिकांनी केली होती, अशी माहिती 'परिवर्तन हेल्पलाईन'चे मुख्य समन्वयक ऋषभ खरात यांनी दिली.

### परिसरातील नागरिकांनी व्यक्त केले समाधान...

**अण्णासाहेब मगर सहकारी बँक लि. भोसरी चेअरमन व वेदिक विजडंम् एज्युकेशनल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष प्रा. राजेश सस्ते म्हणाले की, संपूर्ण दगड-खडी वर आली आहे. खड्डे पडले होते. दुचाकी या खडी वरून घसरत असून अपघाताचा धोका होता. 'मॉर्निंग वॉल्क' ला येणाऱ्या महिला, पुरुष व लहान मुले यांच्या अनेकदा तक्रारी आल्या आहेत. त्यामुळे खोदलेल्या रस्त्यावर पुन्हा डांबरीकरण करण्याची मागणी केली होती. यावर 'परिवर्तन हेल्पलाई'च्या माध्यमातून रस्त्याच्या दुरूस्तीचे काम पूर्ण करण्यात आले. याबाबत परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.**

## संपादकीय »

# 'भज गोविंदं मूढमते'

***राज्यातली शिवसेनेची अवस्था पाहता कोश्यारी यांनी मुद्दामच सेनेला डिवचण्यासाठी आणि तिच्यात किती दम उरला आहे, याची चाचपणी करण्यासाठी ही पुडी सोडून दिली, असे काहींना वाटते. एकतर, कोश्यारी इतका विचार करून बोलत असतील, असे त्यांच्या आधीच्या वाह्यात विधानांवरून वाटत नाही.***

दुसरे म्हणजे, ते जर इतके उघडपणे राजकारणात सतत नाक खुपसत असतील तर त्यांनी गाशा गुंडाळलेला बरा. राज्यपाल या नात्याने कोश्यारी यांनी विधान परिषदेचे आमदार अडकवून ठेवले किंवा पहाटे उठून फडणवीस-पवारांना शपथ दिली, वगैरे आक्षेप आहेतच. ते घेण्यात चूक नाही. राज्यपाल म्हणून त्यांनी घेतलेल्या निर्णयांना न्यायालयात आव्हानही देण्यात आले. ती न्यायालयीन लढाई वेगळ्या पातळीवरची आणि राज्यपाल या पदाची कर्तव्ये व व्याप्ती ठरविण्यासाठी उपयुक्त ठरेल. मात्र, व्यासपीठांवरची विधाने व त्यांचे संभाव्य अर्थ समजायला विवेक जागा असावा लागतो. महाराष्ट्रात समर्थ रामदास आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नात्याविषयी अनेक दशके वाद चालू आहे. गेल्या काही वर्षांत या चर्चेला विषारी असे जातीय वळण लागले आहे. या पार्श्वभूमीवर ज्या विधानांना ठोस ऐतिहासिक पुरावा नाही; अशी विधाने कोश्यारी यांनी करण्याची गरज नव्हती. ती विधाने त्या दोन्ही महापुरुषांवर अन्याय करणारी होती. पण त्यांनी ती केली. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या विवाहाच्या वेळी असणाऱ्या वयाची कोश्यारी यांनी व्यासपीठावरून केलेली चर्चा तर अभिरूचीला सोडून होती. त्यांच्या तेव्हाच्या बालविवाहाच्या रूढीबद्दलच्या बोलण्यात काही समाजशास्त्रीय गांभीर्यही नव्हते. परवा कोश्यारी यांच्या विधानानंतर टीकेचे मोहोळ उठले. त्यानंतर, अचानक जाग आल्यासारखी 'मराठी माणसाचे योगदान कमी लेखण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही,' अशी सारवासारव कोश्यारी यांनी केली. मग हेच त्यांना त्या समारंभात बोलता आले नसते का? की तेव्हा फक्त समोरच्या श्रोतृवृंदाच्या टाळ्यांसाठी ते वाणी झिजवत होते? प्रत्येक समाजाचे कौतुक केले जाते, तेव्हा त्यात दुसऱ्या समाजाचा अपमान नसतो, हा राज्यपालांचा खुलासा दिशाभूल करणारा आहे. विशिष्ट समाजाला महाराष्ट्रातून काढले तर काहीच उरणार नाही, असे म्हणणे म्हणजेच इतर सारे शून्यवत आहेत. राज्यपालांवर चौफेर टीका होते आहे. ती योग्य आहे. मात्र, तीत आत्मपरीक्षणाचा गंभीर स्वर नाही, याची नोंद घेण्याची आवश्यकता आहे. मुंबईत, महाराष्ट्रात आणि राष्ट्रीय पातळीवरही मराठी माणसांचा विविध क्षेत्रांमधील प्रभाव कितपत टिकला किंवा वाढला आहे, याची सखोल चर्चा या निमित्ताने व्हावी. राज्यपालांवर सारे राजकीय पक्ष तुटून पडले. पण त्यांच्याच नादानपणामुळे मराठी माणसाची सतत चौफेर पीछेहाट होत आली आहे.



## आनंदी सकाळ

# नामाशी विन्मुख तो नर पापिया...

हरीविन धावया न पवे कोणी...

समर्थांनी नामाच्या समासात सांगितले आहे तसे, नाम हेच रूप असे समजून घेत चला, म्हणजे रूप दिसेल. भगवंत हा आपल्या आतमध्ये प्रकट व्हायचा असल्यामुळे, नामस्मरणाच्या योगाने तो हळूहळू प्रकट होत जाणे हेच खरे हिताचे आणि कायमचे असते. डोक्यावर हात ठेवून चमत्कार होणे, काहीतरी तेज दिसणे, दृष्टांत होणे, इत्यादी गोष्टी तात्पुरत्या असतात. एखादा अशक्त, हाडकुळा मनुष्य लठ्ठ होण्यासाठी 'अंगाला सूज येऊ दे' असे म्हणाला तर ते वेड्यासारखे होईल; याच्या उलट, त्याने नीट औषध घेतले तर तो कदाचित लठ्ठ होणार नाही, पण त्याचे शरीर मात्र घट्ट होईल. तसेच परमार्थाच्या अनुभवाचे आहे; आणि हा अनुभव वाढीला लागावा याकरिताच पुण्यतिथी साजरी करावी.

# विमानांचा बिघाड कशामुळे?







भारतीय विमान वाहतूक क्षेत्रामध्ये, विमानांची आणि प्रवाशांची सुरक्षितता, विमानांच्या देखभालीची सध्या असलेली अवस्था किंवा वारंवार होत असलेले बिघाड; त्यामुळे आणीबाणीच्या स्थितीत विमाने उतरणे वगैरे घडत असलेले प्रकार, हा चर्चेचा विषय आहे. त्याविषयी...

देशाच्या एकंदर अर्थव्यवस्थेत ज्या मोजक्या क्षेत्रांचा गेल्या पाच-सात वर्षांत झपाट्याने विकास झाला, त्यापैकी एक क्षेत्र म्हणजे नागरी विमान वाहतूक. कोव्हिडपूर्व काळात भारतात नागरी विमान वाहतूक क्षेत्र हे दर वर्षी २२ टक्के इतक्या वेगाने वाढले आहे. अर्थव्यवस्थेतील दुसऱ्या कोणत्याही क्षेत्राची इतक्या वेगाने वाढ झालेली नाही. नरेंद्र मोदी यांचे सरकार २०१४मध्ये सत्तेवर आल्यानंतर, हवाई वाहतुकीच्या विस्तारासाठी 'उडान' ही योजना आखण्यात आली. त्याची अंमलबजावणीही करण्यात आली. या योजनेअंतर्गत देशातल्या अनेक छोट्या विमानतळांचा विकास करणे, नव्या मार्गांवर हवाई सेवा सुरू करणे, नव्या विमान कंपन्यांना सहजतेने परवानगी देणे आणि सामान्य नागरिकही विमान प्रवास करू शकतील, असे वातावरण निर्माण करणे, ही उद्दिष्टे होती. त्यापैकी बऱ्याच गोष्टी साध्य होताना दिसल्या. विमान वाहतुकीतील सुरक्षितता आणि विमानात होणारे बिघाड या निमित्ताने सध्या देशात थोडे संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या वर्षीच्या मे, जून आणि जुलै महिन्यांत विविध विमान कंपन्यांच्या विमानांमध्ये उड्डाण केल्यावर बिघाड होऊन, त्यांना आणीबाणीच्या स्थितीत उतरावे लागण्याच्या १२ ते १४ घटना घडल्या. यापैकी काही घटना नैसर्गिक, म्हणजे पक्ष्यांची धडक बसणे अशा स्वरूपाच्या असल्या, तरी बाकीच्या अनेक गंभीर स्वरूपाच्या होत्या. चार मे रोजी चेन्नई-दुर्गापूर विमानात इंजिन बिघाड झाला. २८ मे या दिवशी मुंबई-गोरखपूर विमानात कॉकपिटच्या काचेला (विंडशिल्ड) तडा गेला, १९ जूनला दिल्ली-जबलपूर विमानात केबिन प्रेशर लॉस झाला, दोन जुलैला पुन्हा जबलपूर-दिल्ली विमानात केबिनमध्ये धूर येण्याचा प्रकार घडला, पाच जुलैला दिल्ली-दुबई विमानात विंडशिल्डला तडा गेला. या आणि अशा अनेक घटना घडत आहेत. विमानाच्या इंजिनात बिघाड किंवा प्रवासी बसतात त्या ठिकाणी, म्हणजे केबिनमध्ये धूर येणे, डिप्रेशरायझेशन, हायड्रॉलिक सिस्टीममध्ये बिघाड या स्वरूपाचे हे प्रकार घडले. अखेर जुलैच्या शेवटच्या आठवड्यात, नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने स्पाइस जेट या विमान कंपनीला ५० टक्के विमानेच उडवता येतील, असा आदेश दिला आणि या सगळ्या परिस्थितीचे गांभीर्य अधोरेखित झाले.

# महंगाई डायन खाए जात है...

**महागाई वाढण्यामागे केवळ इंधनदरवाढ हे एकच कारण नसून यासाठी अनेक विविध कारणांची भली मोठी यादीच आहे. शासनकर्ते येतात आणि जातात. परंतु, महागाईची कारणे ही वर्षानुवर्षे कायम आहेत. ही सर्व कारणे लक्षात घेऊन यावर कायमस्वरूपी ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे.**



अन्यथा कमाई कितीही असली तरी महागाईच्या लाटेपुढे ती टिकणे अवघड आहे. म्हणूनच आज जवळपास १२ वर्षांनंतरही 'पीपली लाईव्ह' या सिनेमातील गाण्याच्या, 'महंगाई डायन खाए जात हैं,' या ओळी सर्वसामान्यांच्या स्मरणात आहेत.

सखी सैयां तो खूब ही कमात है, पर महंगाई डायन खाए जात है, २०१० साली प्रदर्शित झालेल्या 'पीपली लाईव्ह' या सिनेमातील एका गाण्याच्या या ओळी आजही सर्वसामान्यांच्या स्मरणात आहेत. खरंतर हा सिनेमा आणि त्यामधील गाणी काही सुपरहिट ठरली होती, असा काही भाग नाही. मात्र, सातत्याने वाढणारी महागाई ही आजही या गाण्याच्या ओळी सर्वसामान्यांना स्मरणात ठेवण्यास भाग पाडत आहे.

महागाईचा भस्मासूर सध्या इतका प्रचंड वाढला आहे की, यामुळे सर्वसामान्यांचे जगणेच कठीण होऊन बसले आहे. दैनंदिन वापरातील प्रत्येक गोष्टीसाठी अधिकचे पैसे मोजावे लागत असल्याने सर्वसामान्य मेटाकुटीला आले आहेत. वाढत्या महागाईवर नियंत्रण मिळविण्यासाठी शासन दरबारी प्रयत्न सुरू असल्याचा कांगावा सत्ताधाऱ्यांकडून नेहमी केला जातो. यात काही नावीन्य नाही. तर महागाईवर नियंत्रण मिळविण्यात सत्ताधारी अपयशी ठरल्याच्या टीकेचे ढोल सातत्याने विरोधकांकडून बडवले जातात. राजकारणात हे चालायचेच. परंतु सत्ताकर्ते कोणीही असो. वास्तव हेच आहे की, आजपर्यंत महागाईवर नियंत्रण मिळविणे हे कोणालाही शक्य झालेले नाही. याआधीचे राज्यकर्ते असोत किंवा सध्याचे अच्छे दिन आले ते केवळ महागाईचेच. सर्वसामान्यांच्या पदरी पडली ती मात्र फोल आश्वासनेच. कटू असले तरी हे वास्तव आहे आणि हे नाकारून चालणार नाही.

गेल्या काही महिन्यांपूर्वी सातत्याने होणारी इंधन दरवाढ ही महागाई वाढीला कारणीभूत असल्याचे काही आर्थिक तज्ज्ञांचे म्हणणे होते. इंधनाचे दर वाढताच वाहतूक खर्चामध्ये वाढ होते आणि प्रत्येक जीवनावश्यक गोष्टींच्या दरामध्ये वाढ होते, असे दावे या आर्थिक तज्ज्ञांकडून केले जातात. महागाईत वाढ होण्यासाठीचे हे प्राथमिक कारण दिले जाते. परंतु, या व्यतिरिक्तही महागाईवाढीसाठी अनेक कारणे असून तीदेखील विचारात घेणे तितकीच महत्वाची आहेत. केवळ इंधन दरवाढीमुळेच महागाई वाढते, असा कयास बांधणे कदाचित चुकीचे ठरेल. कारण, सातत्याने होणाऱ्या इंधन दरवाढीमुळे जीवनावश्यक वस्तूंचे दर गगनाला भिडत असल्याची ओरड होऊ लागताच, केंद्र सरकारने इंधनांवरील करात कपात करण्याचा निर्णय घेतला.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### कोळशामुळे 'आनंदवन'वर जप्तीची कारवाई शक्य!



। चंद्रपूर। महाईन्यूज ।

ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे यांनी महारोग्यांच्या सेवेसाठी 'आनंदवन'ची स्थापना केली. आनंदवनात आतापर्यंत ११ लाख कुष्ठरुग्णांवर उपचार करण्यात आले. देशात ११९ कायदे कुष्ठरुग्णांच्या विरोधात आहेत. आनंदवन व सोमनाथ प्रकल्प जेथे उभे आहेत, त्या जमिनीखाली मोठ्या प्रमाणात कोळशाचा साठा आहे. यामुळे आनंदवनवर कधीही जप्तीची कारवाई होऊ शकते, अशी भीती डॉ. विकास बाबा आमटे यांनी व्यक्त केली.

आनंदवन मित्र मंडळ, महाराष्ट्र व डॉ. विकास बाबा आमटे अमृत महोत्सव सत्कार समितीच्या वतीने महारोगी सेवा समिती, वरोरा व आनंदवनचे सचिव डॉ. विकास आमटे यांचा अमृतमहोत्सवी सत्कार मुख्यमंत्री सभागृहात पार पडला. सत्काराला उत्तर देताना डॉ. विकास आमटे बोलत होते.

# 50 खोके घेतल्याचा आरोप अजित पवार, सुप्रिया सुळे, आदित्य ठाकरेंना भोवणार?

## शिंदे गटाच्या आमदारांवर 50 खोके घेतल्याचा आरोप करणाऱ्यांविरोधात मानहानीचा खटला दाखल केला जाणार

। मुंबई । महाईन्यूज ।

राज्याचे कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्याबद्दल अपशब्द वापरल्याने, राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापल्याचे दिसून आले. राष्ट्रवादी काँग्रेसने आक्रमक भूमिका घेत सत्तारांनी २४ तासांच्या आत माफी मागावी असा अल्टिमेटम दिला आणि त्यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करावी, अशी मागणी केली आहे. दरम्यान, सत्तारांच्या या वक्तव्यावर अनेकांच्या प्रतिक्रिया समोर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर शिवसेना (शिंदे गट) प्रवक्ते विजय शिवतारे यांनी प्रसारमाध्यमांसमोर पक्षाची भूमिका स्पष्ट केली. यावेळी त्यांनी शिंदे गटाच्या आमदारांवर ५० खोके घेतल्याचा आरोप करणाऱ्यांविरोधात मानहानीचा खटला दाखल केला जाणार



असल्याचेही सांगितले. यावेळी त्यांनी विरोधी पक्षनेते अजित पवार, राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे आणि माजी मंत्री आदित्य ठाकरेंनाही इशारा दिला. विजय शिवतारे म्हणाले, "काल सुप्रिया सुळे असं म्हणाल्या की, जर माझ्यावर कोणी असे आरोप केले असते तर मी त्याला नोटीस दिली असती. मी त्याच्यावर अब्रुनुकसानीचा दावा केला असता, मानहानीचा खटला केला असता. सुप्रिया सुळेंचा हा सल्ला आम्ही ऐकलेला आहे. माझी बऱ्याच आमदारांशी आणि मुख्यमंत्र्यांशी चर्चा झाली आहे. हे कुठंतरी थांबलं पाहिजे. जर इतक्या ताकदीने महाराष्ट्राच्या जनतेच्या हितासाठी जे हिंदुत्वाचं नैसर्गिक सरकार बनलेलं आहे, त्याला जर अशाप्रकारे दोष दिले जात असतील आणि त्याची बदनामी केली जात असेल तर निश्चितपणे ५० आमदारांच्यावतीने प्रत्येकी ५० कोटी असे २ हजार ५०० कोटींचे अब्रुनुकसानीचे दावे, मानहानीचे खटले, उद्या त्याची प्रक्रिया सुरू होत आहे, नोटीसा दिल्या जातील."

याचबरोबर "खोके आणि बोके अजित पवारही म्हणत आहेत, सुप्रिया सुळेही म्हणत आहेत आणि आदित्य ठाकरेही म्हणत आहेत, या तिघांनाही नोटीसा पाठवल्या जातील. एकतर तुम्ही दिशाभूल करणारी वक्तव्य केल्याबद्दल महाराष्ट्राच्या जनतेची माफी मागा नाहीतर मानहानीच्या खटल्याला सामोरं जा. तुम्ही जे ५० खोके घेतल्याचा आरोप करत आहात, त्याचे सर्व पुरावे न्यायालयात सादर करावेत. निश्चतपणे खरं काय आणि खोटं काय हे स्पष्ट होईल." असंही यावेळी शिवतारे यांनी सांगितलं.

# खराब रस्त्यांबाबत केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी मागितली जनतेची माफी!

।मुंबई । महाईन्यूज ।

**केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी एक वक्तव्य केले आणि जनतेची मने जिंकली. मध्य प्रदेशमधील रस्ते खराब असल्याने जनतेला त्रास सहन करावा लागतो यावरूनच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी जनतेची माफी मागितली आहे. नितीन गडकरी मध्य प्रदेशच्या दौऱ्यावर होते. यावेळी मंडलाच्या खराब रस्त्यावरून नितीन गडकरी जनतेला उद्देशून, 'तुम्हाला त्रास झाला, मी माफी मागतो' असं नितीन गडकरी म्हणाले.**

मंडलामधील रस्त्यांच्या भूमिपूजन कार्यक्रमाला नितीन गडकरी उपस्थित होते. यावेळी नितीन गडकरी यांच्याकडे जबलपुर – मंडला या 400 कोटींच्या रस्त्याचे खराब काम झाले अशी तक्रार करण्यात आली. यावर नितीन



गडकरी म्हणाले, 'जर चूक झाली असेल तर माफीही मागायला हवी'. 400 कोटींचा खर्च करून 63 किमी लांबीच्या दोन लेनचा रस्ता बनविणे सुरु आहे. मी रस्त्याच्या कामावर खूश नाही,असंही नितीन गडकरी म्हणाले. यानंतर नितीन गडकरींनी या हायवेचे उर्वरीत काम तातडीने थांबवावे. जुने काम जे झाले आहे. त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, नवीन टेंडर काढून चांगला रस्ता करावा, असे आदेशसुद्धा नितीन गडकरी यांनी दिले. याचसोबत आलेल्या जनतेला, तुम्हाला जो त्रास झाला आहे, त्यासाठी मी माफी मागतो, असं नितीन गडकरी म्हणाले.

केंद्रीय राज्यमंत्री फग्गन सिंह कुलस्ते यांनी जनतेची तक्रार नितीन गडकरी यांच्यापर्यंत पोहोचविली होती. यावर नितीन गडकरींनी कंत्राटदाराकडून ते काम तातडीने काढून घेण्याचे आदेश दिले. नितीन गडकरी मंडलामध्ये 1261 कोटींच्या एकूण 329 किमी लांब 5 राष्ट्रीय राजमार्गांच्या कामाचा शिलान्यास करण्यासाठी तिथे पोहोचले होते.

# "अब्दुल सत्तारांना बडतर्फ करा"!

## राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्यपालांना निवेदन

। मुंबई । महाईन्यूज ।

अब्दुल सत्तार यांनी सुप्रिया सुळे यांना शिवीगाळ केल्यानंतर राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या मुद्द्यावरून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष चांगलाच आक्रमक झाल्याचे बघायला मिळते आहे. दरम्यान, आज राष्ट्रवादी काँग्रेसने अब्दुल सत्तार यांना मंत्रीमंडळातून बडतर्फ करण्याची मागणी केली आहे. तसे निवेदन त्यांनी आज राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना दिले आहे. राज्यपालांना निवदेन दिल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी माध्यमांशी संवाद साधला. सुप्रिया सुळेंविरोधात अपशब्दांचा वापर करून अब्दुल सत्तार यांनी खालचा स्तर जाहीर केला आहे. राज्याच्या मंत्रीमंडळात असणाऱ्या एका जबाबदार मंत्र्याने अशी भाषा वापरणे तसेच भारताच्या संसदेच्या सदस्य असेलल्या महिलेचा अशा प्रकारे अपमान करणे, याचा निषेध आज संपूर्ण महाराष्ट्रभर करण्यात येत आहे. अशा मंत्र्याला मंत्रीमंडळातून बडतर्फ



करण्याची मागणी करणारे निवेदन आम्ही राज्यपालांना दिले आहे", अशी प्रतिक्रिया जयंत पाटील यांनी दिली आहे."ही पहिली घटना नाही. यापूर्वी जिल्हाधिकाऱ्यांना चहाऐवजी दारु पिता का? असा प्रश्न त्यांनी विचारला होता. अनेकवेळा त्यांनी अशा प्रकारे विधानं केली आहेत. मंत्रीमंडळातील सदस्यांनी काही मर्यादा सांभाळाव्या लागतात. मात्र, त्याचे वारंवार उल्लंघन करण्यात येत आहे. त्यामुळे त्यांना बडतर्फ करण्यात यावे, अशी मागणी आम्ही राज्यापालांकडे केली आहे", असेही ते म्हणाले."मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी ताबडतोब याबाबतीत निर्णय घेतला पाहिजे. राज्यात असा प्रकारे भाषा वापरण्याची पद्धत नाही. राज्याची एक राजकीय संस्कृती आहे. आपण कितीही एकमेकांचे विरोधक असलो, तरीही भाषेची मर्यादा नेहमीच सर्वांनी सांभाळली आहे. आपण कोणाचा अरे-तुरे असा एकेरी उल्लेखही करत नाही, अशा परंपरेला छेद देण्याचे काम सत्तार यांनी केले आहे", अशी टीकाही त्यांनी केली."राज्यपाल हे सर्वोच्च आहेत. सरकार ऐकत नसेल तर त्यांना आम्ही कैफियत मांडू शकतो. हा विषय माफी मागून संपणार नाही. हवे ते विधान करता मग माफी मागता हे महाराष्ट्रात चालणार नाही. सरकारमधील लोकांनी विचार करावा, त्यांना आपले सहकारी कसे हवेत. अब्दुल सत्तार यांच्यावर साधा गुन्हा दाखल केला जात नाही. मंत्री आहेत म्हणून पोलीस घाबरत असतील तर पोलिसांनी आपल्या कर्तव्यापासून चुकू नये, सरकारे येतात आणि सरकारे जात असतात", असे आवाहनही जयंत पाटील यांनी केले.

# अरे, मी दहशतवादी किंवा भ्रष्ट असेल तर मला अटक करा !

## केजरीवालांचा भाजपावर हल्लाबोल

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे अध्यक्ष अरविंद केजरीवाल यांनी आज ट्विटरच्या माध्यमातून भाजपावर हल्लाबोल केला आहे. भाजपकडून आपल्याला गोवण्याचा कट रचला जात असल्याचा आरोपही केजरीवाल यांनी केला आहे.**



**अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील आम आदमी पक्ष गुजरात विधानसभा निवडणुकीत स्वतःला भाजपचा प्रमुख प्रतिस्पर्धी पक्ष म्हणून पुढे येत आहे. अशा परिस्थितीत अरविंद केजरीवाल भाजपला कोंडीत पकडण्याची एकही संधी सोडत नाहीत. आपकडून इसुदान गढवी यांना मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार म्हणून घोषित करण्यात आले. इसुदान गढवी हे आपचे राष्ट्रीय संयुक्त सरचिटणीस आहेत आणि पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य देखील आहेत. दुसरीकडे भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक 9 आणि 10 नोव्हेंबर रोजी पक्षाच्या मुख्यालयात होणार आहे. या बैठकीत गुजरात विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची नावे निश्चित केली जाणार आहेत. त्यात गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सीआर पाटीलही सहभागी होणार आहेत.**

अरविंद केजरीवाल यांनी ट्विट करत लिहिले की, केजरीवाल दहशतवादी आहेत. एचएमने तपास सुरू केला. त्याचे काय झाले? आता गुजरात/एमसीडी आदी ते केजरीवाल भ्रष्टाचारी आहेत असे म्हणत आहेत, अहो, केजरीवाल दहशतवादी किंवा भ्रष्ट असेल तर त्याला अटक करा ना? केजरीवाल दहशतवादी किंवा भ्रष्ट नाही.

केजरीवाल हे जनतेचे लाडके आहेत. याचा भाजपला फटका बसला आहे. असा दावा केजरीवालांनी केला आहे.

अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील आम आदमी पक्ष गुजरात विधानसभा निवडणुकीत स्वतःला भाजपचा प्रमुख प्रतिस्पर्धी पक्ष म्हणून पुढे येत आहे. अशा परिस्थितीत अरविंद केजरीवाल भाजपला कोंडीत पकडण्याची एकही संधी सोडत नाहीत. आपकडून इसुदान गढवी यांना मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार म्हणून घोषित करण्यात आले.

इसुदान गढवी हे आपचे राष्ट्रीय संयुक्त सरचिटणीस आहेत आणि पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य देखील आहेत. दुसरीकडे भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक 9 आणि 10 नोव्हेंबर रोजी पक्षाच्या मुख्यालयात होणार आहे. या बैठकीत गुजरात विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची नावे निश्चित केली जाणार आहेत. त्यात गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सीआर पाटीलही सहभागी होणार आहेत.

राज्यात 1 आणि 5 डिसेंबरला दोन टप्प्यात मतदान होणार आहे. तर मतमोजणी 8 डिसेंबरला होणार आहे. सध्या राज्यात भाजपचे सरकार असून येथे पंतप्रधान मोदींच्या अनेक सभा होत आहेत.

## यंदाची G20 परिषद भारतात; पंतप्रधान मोदींनी लॉंच केली वेबसाईट

### G20 लोगोचे चिन्ह आशेचे प्रतीक आहे

।नवी दिल्ली।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

यंदाची जी 20 देशाची शिखर परिषद 2023 भारतात होणार आहे. या निमित्ताने 20 देशातील पंतप्रधान राष्ट्राध्यक्ष यासह त्यांचे सचिव राजदूत आणि इतर खात्याचे विविध अधिकारी भारतात येणार आहेत. याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी भारतात होणाऱ्या G20 परिषदेची वेबसाईट लॉंच केली आहे. या वेबसाईट्सह लोगो आणि थीम देखील जाहीर केली आहे.

यावेळी नरेंद्र मोदी म्हणाले की, 'भारताच्या G20 परिषदेच्या ऐतिहासिक प्रसंगी मी देशवासियांचे अभिनंदन करतो. 'वसुधैव कुटुंबकम' हे जगाप्रती भारताच्या करुणेचे प्रतीक आहे. कमळ भारताचा सांस्कृतिक वारसा आणि जगाला एकत्र आणण्याचा विश्वास दर्शवते. जग विनाशकारी COVID-19 साथीच्या रोगानंतरच्या परिणामांमधून जात आहे. अशा परिस्थितीत, G20 लोगोचे चिन्ह आशेचे प्रतीक आहे. कितीही प्रतिकूल परिस्थिती आली तरी कमळ फुलतच राहते. पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे म्हणाले की, G20 लोगो हा केवळ लोगो नसून तो एक संदेश आणि भावना आहे जो आपल्या शिरपेचात आहे. हा एक ठराव आहे, जो आपल्या विचारात समाविष्ट करण्यात आला आहे, 'कमळावरील सात पाकळ्या जगातील सात खंड आणि संगीताच्या सात स्वरांचे प्रतिनिधित्व करतात. G20 जगाला सामंजस्याने आणेल. या लोगोमधील कमळाचे फूल भारताचा पौराणिक वारसा, आपली श्रद्धा, आपली बुद्धी दर्शवत आहे.

1 डिसेंबरपासून भारत इंडोनेशियाकडून G20 चे अध्यक्षपद स्वीकारणार आहे, G20 परिशद किंवा 20 देशांचा समूह हा जगातील प्रमुख विकसित आणि विकसनशील अर्थव्यवस्थांचा आंतरशासकीय मंच आहे. यामध्ये अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, ब्राझील, कॅनडा, चीन, फ्रान्स, जर्मनी, भारत, इंडोनेशिया, इटली, जपान, कोरिया प्रजासत्ताक, मेक्सिको, रशिया, सौदी अरेबिया, दक्षिण आफ्रिका, तुर्की, यूके, यूएस आणि युरोपियन युनियन (EU) यांचा समावेश आहे.

---

## उत्तर प्रदेशमध्ये भाविकांनी भरलेली बोट उलटली

### 30 जण बुडाले; तिघांचा मृत्यू

। बाराबंकी ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



उत्तर प्रदेशातील बाराबंकीमधून एक मोठी बातमी समोर येत आहे. सुमली नदीत भाविकांनी भरलेली बोट उलटली, त्यामुळे 30 जणांचा बुडून मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. 3 मुलांचा बुडून मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे, तर 7 जणांना बाहेर काढून रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या घटनेत 20 जणांना सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे.

सर्व लोक बोटीवरून कुस्ती पाहण्यासाठी जात होते, त्यादरम्यान बोटीचा तोल बिघडल्याने ती उलटली आणि मोठी दुर्घटना घडली. सध्या प्रशासनाचे पथक घटनास्थळी बचावकार्य करत आहे. डीएम, एसपी आणि इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी उपस्थित आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, सुमली नदीच्या पलीकडे मोहम्मदपूर खला पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बैराणा माळ माझरी गावात जत्रा आणि कुस्ती सुरू होती. ते पाहण्यासाठी लोक जात होते, त्याच दरम्यान हा अपघात झाला. दरवर्षी कार्तिक पौर्णिमेनिमित्त बैराणा माळ माझरी गावातील गगरण देवाच्या ठिकाणी जत्रा भरते. यात भाविक मोठ्या संख्येने सहभागी होतात. यावेळीही लोक जत्रा पाहण्यासाठी छोट्या होडीतून जात होते. त्यानंतर मोहम्मद पूर खला पोलीस

## शिक्षण म्हणजे नफा कमावण्याचा व्यवसाय नाही!

### शुल्क परवडणारेच असावे–सर्वोच्च न्यायालयाने नोंदविले निरीक्षण

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**शिक्षण हा नफा कमाविण्याचा व्यवसाय नाही आणि ट्युशन फी नेहमीच परवडणारे असले पाहिजे, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी नोंदविले. आंध्र प्रदेश सरकारने शुल्क वाढवून वर्षाला 24 लाख करण्याचा निर्णय घेतला आहे, जे निर्धारित शुल्कापेक्षा सात पट जास्त आहे. हे अजिबात न्याय्य नाही, असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.**



**आंध्र प्रदेश सरकारने शुल्क वाढवून वर्षाला 24 लाख करण्याचा निर्णय घेतला आहे, जे निर्धारित शुल्कापेक्षा सात पट जास्त आहे. हे अजिबात न्याय्य नाही, असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.**

एमबीबीएस विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्क वाढवण्याचा राज्य सरकारचा निर्णय आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने रद्दबातल केला होता. उच्च न्यायालयाचा हा निर्णय न्यायमूर्ती एम. आर. शहा आणि न्यायमूर्ती सुधांशू धुलिया यांच्या खंडपीठाने सोमवारी हा निर्णय कायम ठेवताना शुल्काबाबत टिप्पणी केली होती. आंध्र प्रदेश सरकारने 6 सप्टेंबर 2017 रोजी एक जीआर जारी करत एमबीबीएसच्या ट्युशन फीमध्ये वाढ केली होती. सन 2017-2020च्या ब्लॉक वर्षासाठी शैक्षणिक शुल्क वाढविण्याचा सरकारी आदेश रद्द करण्यात उच्च न्यायालयाने कोणतीही चूक केलेली नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. हे ध्यानी घेता 06 सप्टेंबर 2017च्या बेकायदेशीर सरकारी आदेशानुसार वसूल केलेली तसेच संकलित केलेली रक्कम ठेवण्याची व्यवस्थापनाला परवानगी दिली जाऊ शकत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

उच्च न्यायालयाने रद्दबातल केलेल्या या 6 सप्टेंबर 2017च्या बेकायदेशीर सरकारी आदेशाचे वैद्यकीय महाविद्यालयेलाभार्थी आहेत. कारण वैद्यकीय महाविद्यालयांनी ही रक्कम अनेक वर्षांपासून वापरली आणि त्यांच्याकडे ठेवली, असे सांगून न्यायालयाने सांगितले की, दुसरीकडे अनेक वर्षांपासून विद्यार्थ्यांनी वित्तीय संस्था आणि बँकांकडून जास्त व्याजाने कर्ज घेत भरमसाठ शिक्षण शुल्क भरले आहे.

# ‘बालभारती’चे अफलातून हटके मोशन पोस्टर प्रदर्शित

‘बालभारती’मध्ये सिद्धार्थ जाधव, नंदिता पाटकर, उषा नाईक, आर्यन मेंघजी, रवींद्र मंकणी हे आघाडीचे कलाकार प्रमुख भूमिकेत असून अभिजित खांडकेकर दिसणार विशेष भूमिकेत. २ डिसेंबर रोजी सर्वत्र प्रदर्शित होत असलेल्या मराठी चित्रपट ‘बालभारती’चे मोशन पोस्टर नुकतेच प्रकाशित करण्यात आले. 23 सेकंदांच्या या मोशन पोस्टरमध्ये या चित्रपटातील आघाडीचे कलाकार दिसतात. एकंदर पोस्टर पाहता हा चित्रपट आणि त्याचा विषय किती वेगळा आहे हे लक्षात येते. ‘बालभारती’ चे दिग्दर्शन नितीन नंदन यांचे आहे आणि निर्मिती ‘स्फियरओरीजीन्स’ यांनी केलेली आहे.



या मोशन पोस्टरचा नवखेपणा म्हणजे, यात आर्यन मेंघजी हा बाल कलाकार आईनस्टाइनच्या भन्नाट रुपात अनेक गॅझेटच्या च्या गराड्यात बसलेला दिसतो. समोर एक पेंड्यूलम म्हणजे लोलक हलताना दिसतो त्यावर मराठी व इंग्लिश आद्याक्षरे लिहिलेली आहेत. त्यात एक आयडिया त्याच्या डोक्यात येते आणि तिची चमक त्याच्या चेहऱ्यावर दिसते आणि त्याचे डोळे चकाकतात. मग गम्मत सुरू होते. एक एक कलाकार दिसू लागतात. नंदिता पाटकर ‘टॉक इन इंग्लिश’ लिहिलेले हेल्मेट घालून येते, अभिजित खांडकेकर मुलाचे कौतुक करतो आणि पहिल्यांदाच वडिलांच्या भूमिकेतील सिद्धार्थ जाधव मोठ्या तन्मयतेने इंग्लिश-मराठी डिक्शनरी वाचताना दिसतो.

मग शेवटी एक विमान उडत जाते आणि समोर शब्द येतात – ‘मीट द न्यू चाइनस्टाइन!’ हे मोशन पोस्टर प्रेक्षकांना या चित्रपटाच्या विषयावर विचार करायला नक्की भाग पाडेल! पालकांच्या मनामध्ये सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्या मुलांच्या शिक्षणाबद्दल असलेली चिंता. तीच बालभारती मध्ये रंगवलेली आहे. सर्व आईवडील नेहमी हा विचार करत असतात की आपल्या मुलांना उत्तम शिक्षण मळावे. महाराष्ट्राच्या संस्कृतीत आणि सद्य परिस्थितीत रुजलेली ही आजची कथा आहे. म्हणून आजच्या प्रत्येक घराची ही कथा आहे. यामध्ये मराठी भाषा, सर्जनशीलता आणि नाविन्य किंवा संशोधन यांचा मिलाफ आहे.

# भयचक्राच गूढ अनुभव देणार नाटक ‘ यू मस्ट डाय ’

नाटकं ही वेगवेगळ्या प्रकारचा अनुभव देतात. हा अनुभव आनंद देणारा असतो, समाधान देणारा असतो किंवा कधी अस्वस्थ करणाराही असू शकतो. नाट्यक्षेत्रातील मात्तबर जाणकारांसोबत युवा लेखक आणि दिग्दर्शकांची फळी काही नवं करू पाहते आहे. यात लेखक दिग्दर्शक नीरज शिरवईकर हे नाव आघाडीवर आहे. ज्येष्ठ दिग्दर्शक विजय केंकरे यांच्या साथीने ‘अ परफेक्ट मर्डर’ च्या खेळात प्रेक्षकांना गुंतविल्यानंतर आता पुन्हा ही जोडी ‘यू मस्ट डाय’ हे नवीन सस्पेन्स थ्रिलर नाटकं घेऊन प्रेक्षकांना भयचक्राचा गूढ अनुभव द्यायला सज्ज झाले आहेत. या नाटकाचे लेखन नीरज शिरवईकर तर दिग्दर्शन विजय केंकरे यांचे आहे. प्रवेश आणि वरदा क्रिशन्स निर्मित




‘यू मस्ट डाय’ या नाटकाचा शुभारंभ १२ नोव्हेंबरला होणार आहे. नाटकाची निर्मिती अदिती राव यांनी केली आहे. जिथे पारदर्शकता असते तिथेच काही गुपीतंही दडलेली असतात. अशाच एका रहस्याची, त्या रहस्यामागे असणा-या व्यक्तीचा मागोवा घेताना निर्माण होणारे गूढ ‘यू मस्ट डाय’ या नाटकात पहायला मिळणार आहे. रहस्याची उकल होते न होते, असं वाटत असतानाच दुसरं रहस्य पुढं येऊन उभं ठाकतं. एक वेगळा खेळ इथे रंगतो. यामागे नक्की काय वास्तव आहे? याची खिळवून ठेवणारी मनोरंजक कथा या नाटकात पहायला मिळणार आहे शर्वरी लोहकरे, सौरभ

# प्रियंकाच्या सुरक्षेत वाढ



बॉलिवूडनंतर हॉलिवूडमध्ये आपल्या अभिनयाची छाप उमटवणारी अभिनेत्री प्रियंका चोप्रा सध्या भारतात आहे. जवळपास तीन वर्षांनंतर प्रियंका भारतामध्ये आली आहे. भारतात आल्यापासून प्रियंका अनेक इंवेट्सला भेटी देत आहे. याचंदरम्यान, प्रियंका चोप्राचे फोटो आणि व्हिडीओ देखील व्हायरल होत आहे. प्रियंकाच्या काही फोटो आणि व्हिडीओमुळे तिला सोशल मीडियावर ट्रोल केलं जात आहे. मात्र, प्रियंकाचे चाहते ती भारतामध्ये आल्यामुळे खूप खूश झाले आहेत. याचंदरम्यान, प्रियंका चोप्रासोबत एक विचित्र प्रकार घडला आहे.


प्रियंकाच्या सुरक्षेत करण्यात आली वाढ

बॉलिवूड आणि हॉलिवूड अभिनेत्री प्रियंका चोप्रा सोशल मीडियावर खूप सक्रिय असते. सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रियंका तिच्याबद्दल अनेक अपडेट देत असते. नुकत्याच एक-दोन दिवसांपूर्वी प्रियंकाने ती लखनऊला जात असल्याची माहिती दिली होती. त्यानंतर ती लखनऊला पोहोचली आणि तिथल्या निगोहाच्या लालपूरमधील एका आंगणवाडीमध्ये भेट दिली. यावेळी असा काही प्रकार घडला ज्याचा कोणी विचार देखील केला नसेल. खरंतर, प्रियंका चोप्रा आंगणवाडीमध्ये फिरत असताना त्यावेळी एक तरुण प्रियंकाला भेटण्यासाठी भिंत ओलांडून आतमध्ये आला. परंतु यावेळी त्याला पोलिसांनी पकडलं आणि पोलिस स्टेशनमध्ये घेऊन गेले. त्यामुळे आता प्रियंकाच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे.

# आयुष्यातील कोणती गोष्ट बदलायला आवडेल'? बिग बीं नी दिलं उत्तर

टीव्ही मनोरंजन विश्वातील प्रसिद्ध शो कौन बनेगा करोडपतीची लोकप्रियता साऱ्या देशात आहे. भारतीय मनोरंजन विश्वामध्ये या मालिकेनं आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. गेल्या दोन दशकांहून अधिक काळ या रियॅलिटी शो ने पुन्हा एकदा वेगळेपण सिद्ध केले आहे. यासगळ्यात मोठा वाटा आहे तो महानायक अमिताभ बच्चन यांचा. त्यांनी केलेल्या होस्टिंगमुळेच तर या कार्यक्रमाची उंची वाढली आहे.

कौन बनेगा करोडपतीमध्ये हॉट सीटवर बसण्यात स्पर्धकांना जेवढा आनंद होतो त्यापेक्षा सर्वाधिक आनंद हा त्यांना अमिताभ बच्चन यांना भेटून होतो. त्यामुळे कित्येकांनी आपली प्रतिक्रिया देताना भावूक झाल्याचे सांगितले आहे. कित्येक स्पर्धक अमिताभ यांना पाहून भारावून जातात. त्यांना काय बोलावे, काय विचारावे असे होऊन जाते. असाच एक प्रसंग समोर आला आहे. त्यामध्ये एका स्पर्धकानं अमिताभ



यांना विचारलेला प्रश्न हा सोशल मीडियावर चर्चेत आला आहे. तुम्हाला तुमच्या आयुष्यात कोणती गोष्ट बदलायला आवडेल असा प्रश्न त्यांना विचारला होता.

कौन बनेगा करोडपतीच्या सेटवर अमिताभ यांची प्रमुख भूमिका असलेला उंचाई नावाच्या चित्रपटाची टीम आली होती. या चित्रपटामध्ये अनुपम खेर, नीना गुप्ता यांच्यासहित अनेकांच्या प्रमुख भूमिका आहेत. यावेळी अमिताभ यांच्याऐवजी त्यांच्यासमोर बसलेल्या पाहुण्या स्पर्धकांनी त्यांना विचारलेल्या प्रश्नांची अधिक चर्चा होती. बोमन इराणी, रीना दत्ता यांनी देखील या शोमध्ये खूप मस्ती केल्याचे दिसून आले.

याप्रसंगी गुप्ता यांनी विचारलेल्या एका प्रश्नानं अमिताभ थोडा वेळ भावूक झाल्याचे दिसून आले. तो प्रश्न असा की, तुम्हाला तुमच्या आयुष्यात कोणती गोष्ट बदलायला आवडेल, अमिताभ म्हणाले, मला काहीही बदलायचे नाही. यापेक्षा जे सुरु आहे तेच नव्यानं जगायला मला आवडेल. असे अमिताभ म्हणाले.

# सूर्यकुमारला रोखावे लागणार : बेन स्टोक्स

**ॲडलेड । महाईन्यूज । वृत्तसंस्था**

सूर्यकुमार यादवने या वर्षी टी-२० मध्ये धावांचा पाऊस पाडला आहे. ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या विश्वकरंडकातही त्याच्या बॅटमधून धावाच धावा निघत आहेत. याच पार्श्वभूमीवर गुरुवारी होणाऱ्या उपांत्य फेरीच्या लढतीआधी इंग्लंडच्या गोटात चिंतेचे वातावरण पसरलेले आहे. इंग्लंडच्या गोलंदाजांना सूर्यकुमार यादवचा झंझावात रोखावा लागणार आहे, असे मत व्यक्त करतानाच इंग्लंडचा अष्टपैलू खेळाडू बेन स्टोक्स याने विराट कोहलीलाही कमी लेखून चालणार नाही, असेही म्हंटले आहे. सूर्यकुमार शानदार फॉर्ममध्ये आहे. फलंदाजीला खेळपट्टीवर उतरल्यापासूनच त्याची धडाकेबाजी फलंदाजी सुरू होते. त्याचे काही फटके तर विचार करायला लावणारे असतात. आमच्या गोलंदाजांना त्याला रोखावेच लागणार आहे, असे स्टोक्स पुढे आवर्जून सांगतो. विराटबाबत स्टोक्स म्हणतो, विराटने क्रिकेटच्या तिन्ही प्रकारांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.



# न्यूझीलंडसाठी पाक धोकादायक!

## ट्वेन्टी-20 विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य लढतीबाबत उत्सुकता

**सिडनी। महाईन्यूज । वृत्तसंस्था**

आयसीसीच्या जवळपास गेल्या प्रत्येक स्पर्धांत सातत्यपूर्ण कामगिरी करून उपांत्य फेरी गाठणाऱ्या न्यूझीलंडचा संघ पाकिस्तानविरुद्ध उपांत्य सामन्यात मात्र कधीच जिंकलेला नाही, त्यामुळे ट्वेन्टी-२० विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत उद्या होणाऱ्या या उपांत्य लढतीबाबत उत्सुकता ताणली गेली आहे.



मायदेशी जायच्या विमानात बसू बघणारा पाकिस्तानचा संघ ध्यानी मनी स्वप्नी नसताना सिडनीला जायच्या विमानात बसला. दक्षिण आफ्रिकन संघाने नेदरलँडसविरुद्ध हार पत्करली आणि पाकला लॉटरी लागली. 'क्रिकेट सामन्यामध्ये काहीही होऊ शकते हे आता नुसते चघळायचे वाक्य राहिले नसून पाकिस्तानसाठी तारणहार ठरणारे वाक्य बनले आहे', पाक संघाचा प्रशिक्षक मॅथ्यू हेडन हसत हसत सांगून गेला.

पाक संघ अत्यंत अनपेक्षितपणे उपांत्य फेरीत पोहोचला असला, तरी १९९२, १९९९ मुख्य वर्ल्ड कप आणि २००७ टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेत याच संघाने न्यूझीलंडला पराभवाचे धक्के दिलेले आहेत. कागदावर दोन्ही संघ समान ताकदीचे भासत आहेत. वेगवान गोलंदाजांचा ताफा दोनही बाजूला आहे. दोन्ही संघांचे मुख्य अस्त्र डावखुरा वेगवान गोलंदाज आहे. फरक इतकाच आहे, की शाहीन शाह आफ्रिदी तेज आहे आणि ट्रेंट बोल्ट स्विंगचा सुलतान आहे. न्यूझीलंड संघाच्या यशाचे रहस्य जसे भरवशाच्या केन विल्यमसन, डेवॉन कॉन्वेवर अवलंबून आहे, तसेच ते फिन ॲलन आणि ग्लेन फिलिप्स या अत्यंत आक्रमक फलंदाजांतही दडले आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्ध मिळवलेल्या विजयाप्रमाणे पाकिस्तानच्या वेगवान माऱ्याला फिन ॲलन शिंगावर घेतो का हे बघायला मजा येणार आहे.

आम्ही साखळी स्पर्धेत चांगली कामगिरी करून पुढे येत असल्याने आमचे सातत्य दिसून येत असले तरी आता आम्हाला उपांत्य आणि अंतिम सामन्याचा अडथळा पार करायची प्रामाणिक इच्छा आहे' केन विल्यमसन म्हणाला.सामन्याच्या आदल्या दिवशी पाक संघ सराव करायला आला नसताना कप्तान बाबर आझमने ४० मिनिटे फलंदाजीचा मन लावून सराव केला. साखळी स्पर्धेत चांगली कामगिरी करता न आल्याने बाबर आझम निर्णायक सामन्यात सर्वोत्तम खेळी करण्याचे सर्व ते प्रयत्न करतो आहे.

पाक संघाचा उपकप्तान शादाब खान खूप चांगल्या लयीत आहे. सुंदर गोलंदाजीबरोबर आक्रमक फलंदाजीत फटकेबाजी शादाब करत आहे. अगोदर संघात नसलेला आणि दुसऱ्या खेळाडूच्या दुखापतीने अचानक संधी मिळालेला २१ वर्षी हॅरिस जोरकस फटकेबाजी करून सगळ्यांचे लक्ष वेधून घेत आहे.

गेल्या काही दिवसांत सिडनीला भरपूर ऊन पडत असल्याने खेळपट्टी तयार करायला वेळ मिळाला आहे.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..

महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही